# मिरा भाईदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. २३/०६/२०२१ रोजी आयोजित केली आहे. सदर सभेकरीता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| २६. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. ०९/०६/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न. | | |
| १) मिरारोड शांती नगर सर्व्हे क्र.२०६ मौजे पेणकर पाडा येथील मोकळी जागा (R.G.) आणि शांतीनगर वसाहतीतील इतर मोकळ्या जागा केव्हा ताब्यात घेण्यात आल्या? (करारनाम्याची प्रत देण्यात यावी.) | | |
| अ) सदर जागा सर्व्हे क्र.२०६ मौजे पेणकर पाडा शांतीनगर वसाहतीच्या मंजूर रेखांकनातील मोकळी जागा (R.G.) जागा असून गेल्या अनेक वर्षापासून मनपाच्या ताब्यात आहे. हे खरे आहे का? | | |
| ब) ही मोकळी जागा ताब्यात असण्याविषयाचे जे विकसित करण्या विषयीचे हमीपत्र मनपाने मा. उच्च न्यायालयात दिले आहे हे खरे आहे का? असल्यास कधी दिले प्रत देण्यात यावी. | | |
| क) या जागा शांतीस्टार बिल्डर विकासकाने मोकळी जागा (R.G.) दाखवून शांतीनगर वसाहतीचे नकाशे मंजूर करुन घेतले हे खरे आहे का? | | |
| ड) सदर जागेवर इतर कब्जेदाराने अनधिकृतपणे कब्जा केल्यानंतर मनपाने शांतीस्टार बिल्डर या विकासकावर कोणती कारवाई केली? | | |
| इ) शांतीस्टार बिल्डर विकासकाला वसाहत बांधण्यासाठी किती व कोणत्या परवानग्या देण्यात आल्या? (प्रत देण्यात यावी.) | | |
| ई) शांतीनगर गृहसंकुलामध्ये एकूण किती R.G. आहे. आजची परिस्थिती काय आहे? | | |
| २७. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. ०९/०६/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न. | | |
| १) मनपाची किती व कोणती आस्थापने (समाज मंदिर व इतर) आहेत? (पूर्ण यादी देण्यात यावी.) | | |
| अ) कोणती आस्थापने बांधलेली जागा मनपाच्या नावावर (७/१२) झाली | | |

| | | |
|---|---|---|
| आहे? | | |
| ब) कोणती आस्थापने बांधलेली जागा मनपाच्या नावावर (७/१२) झाली नाही? | | |
| क) कोणती आस्थापने भाडेतत्वावर कोणाला दिलेली आहेत? | | |
| ड) कोणत्या आस्थापनांचा भाडेकरार कधीपर्यंत अस्तित्वात आहे? | | |
| इ) नावावर न झालेल्या जागेवर (७/१२) बांधण्यात आलेल्या आस्थापनांवर मनपाने किती खर्च केला? | | |
| २८. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. ०९/०६/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न. | | |
| १) मिरारोड शांती नगर सर्व्हे क्र.२०६ मौजे पेणकर पाडा येथील मोकळी जागा (R.G.) शांतीनगर वसाहतीतील इतर मोकळ्या जागा केव्हा ताब्यात घेण्यात आल्या? | | |
| अ) मनपाने याठिकाणी समाज मंदिर, प्रवेशद्वार नाला, रस्ता, दिवा, बत्ती, क्रिकेट पीच, कुंपण भिंत, माती भराव हे बांधण्यासाठी किती खर्च केला? | | |
| ब) सदर जागवेर ऑक्टोबर २०२० मध्ये एका व्यक्तीने आपला अधिकार सांगितला व संपूर्ण जागेला पत्रे मारले. त्यावर पालिकेने कोणती कारवाई केली. मनपाने आपला अधिकार का सोडून दिला? | | |
| क) सदर जागेवर असलेले समाज मंदिर मनपाने कशाप्रकार खाली केले. आजची त्या समाज मंदिराची स्थिती काय? | | |
| २९. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. ०९/०६/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न. | | |
| १) मा. महासभेमध्ये ऑगस्ट २०१७ नंतर कोणकोणत्या विषयाबाबत पदाधिकाऱ्यांची समिती नेमण्यात आली? (किती समित्या नेमण्यात आल्या विषयानुरुप) | | आरोग्य विभाग :- खाजगीकरणामार्फत प्रभाग समिती निहाय दैनंदिन वॉर्डसफाई व घनकचरा व्यवस्थापन या विषयाच्या महासभा दि. ०८/१२/२०१७ रोजी ठराव क्र. ५४ अन्वये पदाधिकाऱ्यांची समिती गठित करण्यात आली होती.<br>परिवहन विभाग :- मा. महासभेमध्ये २०१७ नंतर परिवहन विभागासंबंधी मा. महासभा ठराव क्र. १५, दि. ०२/०५/२०१८ अन्वये परिवहन सेवेचे धोरण निश्चित करणेसाठी मा. आयुक्त यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका पदाधिकारी यांचेसोबत बैठक घेऊन बैठकीच्या निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी असा ठराव पारित करण्यात आला. |

| | | |
|---|---|---|
| अ) प्रत्येक विषयावर चर्चा करण्यासाठी कधी पदाधिकाऱ्याच्या सभा घेण्यात आल्या? | | आरोग्य विभाग :- सदर विषयावर चर्चा करण्यासाठी दि. २६/०३/२०१८ व दि. २१/०६/२०१९ रोजी पदाधिकाऱ्यांच्या सभा घेण्यात आलेल्या आहेत.<br>परिवहन विभाग :- सदर प्रकरणी मा. महापौर यांचे अध्यक्षेतीखाली दि. ११/०७/२०१८ व दि. ०५/०३/२०१९ रोजी पदाधिकारी यांच्या बैठका घेण्यात आल्या. |
| ब) प्रत्येक सभेचे इतिवृत्तांत देण्यात यावे? | | आरोग्य विभाग :- वरील दोन्ही सभेचे इतिवृत्तांत सोबत जोडले आहे.<br>परिवहन विभाग :- उक्त दि. ११/०७/२०१८ व दि. ०५/०३/२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तांची प्रत सोबत जोडून देण्यात येत आहे. |
| क) पदाधिकाऱ्यांच्या सभेमध्ये झालेल्या निर्णयावर कोणती कार्यवाही झाली? | | आरोग्य विभाग :- वरीलप्रमाणे पदाधिकाऱ्यांच्या सभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार मनपा क्षेत्रातील खाजगीकरणामार्फत प्रभाग समिती निहाय दैनंदिन वॉर्ड सफाई व घनकचरा व्यवस्थापन कामाची निविदा काढण्यात आल्या होत्या. परंतु एकच पात्र निविदा प्राप्त झाल्याने सदरची निविदा रद्द करण्यात आली होती.<br>दि. १९/०५/२०२१ रोजीच्या मा. महासभेमध्ये मिरा भाईंदर शहरातील घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २०१६ अन्वये दैनंदिन वॉर्ड साफसफाई करणेकरीता धोरण ठरविणेबाबतचा विषय घेतला असता सदर कामाच्या निविदा मागविणेच्या कामास मंजूरी देण्याकरीता मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र अधिनियम कलम ३(१) अन्वये महापालिकेचे पदाधिकारी व गटनेते यांची समिती गठित करावी असा ठराव पारित करण्यात आला आहे. सदर ठरावानुसार गठित समितीची अद्याप बैठक झालेली नाही. सदरची निविदा प्रस्तावित आहे. सदर ठरावाची प्रत सोबत जोडली आहे.<br>परिवहन विभाग :- दि. ११/०७/२०१८ व दि. ०५/०३/२०१९ रोजीच्या बैठकीमधील घेतलेल्या निर्णयाप्रमाणे परिवहन सेवेसाठी निविदा प्रक्रिया करुन बस ऑपरेटर नियुक्त करण्यात आला होता.<br>तसेच मा. महासभा ठराव क्र.११ दि. १९/०५/२०२१ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेची सेवा सुरळीत चालविणे करीता नविन धोरण ठरविणेबाबत मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र महानगरपालिकेच्या अधिनियम ३१(१) अन्वये पदाधिकारी, गटनेते व परिवहन समिती सभापती यांची कमिटी नियुक्त करुन कमिटीने यावर निर्णय घेण्यास मंजूरी दिली आहे. सदर ठरावाच्या अनुषंगाने आज दि. १६/०६/२०२१ पर्यंत गठित समितीची बैठक झालेली नाही. |
| ३०. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. ०९/०६/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न. | | |
| १) भुमिगत नाले योजना (UNDER GROUND SEVAGE SYSTEM) कधी मंजूर झाली? | | केंद्र शासनाने मिरा भाईंदर महानगरपालिकेकरीता भुयारी गटार योजना दि. ०६/१२/२००७ रोजी मंजूर केली. |
| अ) भुमिगत नाले योजना (UNDER GROUND SEVAGE SYSTEM) मा. | | भुयारी गटार योजनेस मा. महासभेने दि. २१/०२/२००९ रोजी मंजूरी दिली. ठरावाची प्रत सोबत जोडून देत |

| | | |
|---|---|---|
| महासभेने कधी मंजूरी दिली (ठरावाची व करारनाम्याची प्रत देण्यात यावी) | | आहोत. |
| ब) किती STP प्लांट कार्यरत आहेत? | | भुयारी गटार योजने अंतर्गत १० मलनि:सारण केंद्रापैकी ७ मलनि:सारण केंद्रे कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. |
| क) भुमिगत नाले योजना (UNDER GROUND SEVAGE SYSTEM) साठी कोणाची सल्लागार पदी नियुक्ती करण्यात आली? | | भुयारी गटार योजनेसाठी मे. टंडन ॲण्ड असोसिएटस् यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. |
| ड) भुमिगत नाले योजना (UNDER GROUND SEVAGE SYSTEM) साठी सल्लागार यांनी करावयाच्या कोणत्या कामांचा अंतर्भाव होता? | | भुयारी गटार योजनेत तांत्रिक सल्लागार म्हणून काम बघणे. |
| इ) भुमिगत नाले योजना (UNDER GROUND SEVAGE SYSTEM) साठी अजूनपर्यंत सल्लागार यांना किती फी देण्यात आली? | | भुयारी गटार योजनेसाठी मे. टंडन ॲण्ड असोसिएटस् यांना तांत्रिक सल्लागार म्हणून काम बघणेसाठी रु. ८.१६ कोटीचे देयक अदा करण्यात आलेले आहे. |
| ई) भुमिगत नाले योजना (UNDER GROUND SEVAGE SYSTEM) साठी मनपाचा, केंद्र सरकारचा व राज्य सरकाचा किती निधी खर्च झाला व किती मंजूर झाला? | | भुयारी गटार योजने करीता मिरा भाईंदर महानगरपालिकेस केंद्र व राज्य शासनाकडून रु. २१६.६८ कोटी प्राप्त झाले असून ही संपूर्ण रक्कम योजनेवर खर्च झाली आहे. |
| उ) शहरातील कोणकोणत्या भागांमध्ये ही योजना कार्यरत आहे? | | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ग्रामीण भाग तसेच नव्याने विकसीत भाग योजनेत समाविष्ठ नाही. |
| ऊ) कधीपर्यंत ही योजना पूर्ण होणार आहे? | | भुयारी गटार योजनेचे काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत ९७ टक्के काम पूर्ण झालेले असून लवकरच उर्वरीत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. |

**(दिलीप ढोले)**
**अतिरिक्त आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**